# <u>जाहिरात</u>

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या अधिपत्याखालील विशेष शाखा-१, गु.अ.वि., मुंबई येथे केंद्र व राज्य शासनाच्या आस्थापनेवरून सेवानिवृत्त झालेल्या गट ‘अ’ दर्जाच्या अधिकाऱ्यांमधून खालील नमूद केलेले **‘प्रशिक्षक’** हे पद ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने भरावयाचे आहे. सदर पदाकरिता करारातील मासिक पारिश्रमिक (सर्व भत्यांसहित) खालीलप्रमाणे राहील.

| अ. क्र. | पदनाम | **करारातील मासिक देय** पारिश्रमिक **+ इतर भत्ते** | रिक्त पद |
|---|---|---|---|
| १. | **प्रशिक्षक** | केंद्र व राज्य शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त होतेवेळी मिळत असलेले मूळ निवृत्तिवेतन (अंशराशीकरण मुल्य विचारात न घेता) व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रकमेऐवढे पारिश्रमिक आणि अशाप्रकारे निश्चित होणाऱ्या मासिक पारिश्रमिक ‘‘जास्तीत जास्त २५ टक्के इतक्या मर्यादेपर्यंत ’’ भत्त्यांपोटी एकत्रित रक्कम प्रतिमाह देय असेल. | १ |

**प्रशिक्षक** हे पद भरण्यासाठी सेवा, सेवा करारातील मासिक देय रक्कम, सेवा करार कालावधी, वयोमर्यादा, अनुभव, शैक्षणिक अर्हता, अटी व शर्ती, कर्तव्ये व जबाबदाऱ्या, जाहिरात व अर्जाचा विहित नमुना <u>www.mumbaipolice.gov.in</u> या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे. इच्छुक व पात्र उमेदवारांनी त्यांचे पूर्ण भरलेले अर्ज, आवश्यक कागदपत्रांसह दिनांक १०/०९/२०२६ पर्यंत अपर पोलीस आयुक्त, विशेष शाखा-१,गु.अ.वि., बद्रुद्दिन तय्यबजी मार्ग, मुंबई- ४०० ००१ येथे सादर करावेत. लिफाफ्यावर **‘प्रशिक्षक या पदासाठी अर्ज ’** असा स्पष्ट उल्लेख करावा.

सुलभ संदर्भासाठी ईच्छुक उमेदवारांनी सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय क्र. सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दिनांक १० जून, २०२५ चे अवलोकन करावे.

**( डॉ. प्रविण मुंढे )**
**अपर पोलीस आयुक्त**
विशेष शाखा-१, गु.अ.वि., मुंबई.

**पोलीस आयुक्त, मुंबई यांच्या आस्थापनेवरील प्रशिक्षक या पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.**

जाहिरात क्र. ०१ /अपोआ/विशा१/गुअवि/२६, मुंबई, दिनांक - ३१ /०८/२०२६

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या अधिपत्याखालील विशेष शाखा-१, गु.अ.वि., मुंबई येथे केंद्र व राज्य शासनाच्या आस्थापनेवरून सेवानिवृत्त झालेल्या गट 'अ' दर्जाच्या अधिकाऱ्यांमधून खालील नमूद केलेले '**प्रशिक्षक**' हे पद ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने भरावयाचे आहे.

| अ.क्र. | पदनाम | पदांची संख्या |
|---|---|---|
| १. | **प्रशिक्षक** | १ |

उमेदवाराने सोबत दिलेल्या विहित नमुन्यातील अर्ज लिफाफ्यात घालून लिफाफ्यावर उजव्या बाजूला ठळक अक्षरात 'प्रशिक्षक पदासाठी अज' असे नमूद करून दि. १०/०९/२०२६ पर्यंत अपर पोलीस आयुक्त, विशेष शाखा-१, गु.अ.वि., यांचे कार्यालय, बद्रुद्दिन तय्यबजी मार्ग, मुंबई- ४०० ००१ येथे पोहचेल याची दक्षता घ्यावी. दि.१०/०९/२०२६ नंतर या कार्यालयास वैयक्तिक अथवा टपालाद्वारे प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. अर्जासोबत पत्रव्यवहाराकरिता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे जोडावेत.

**करारातील मासिक देय रक्कम**

१. **प्रशिक्षक** या पदाकरिता निवड करण्यात आलेल्या उमेदवाराला क्रेंद अथवा राज्य शासनाच्या सेवेतून ( गट 'अ' दर्जा )सेवानिवृत्त होतेवेळी मिळत असलेले मूळ निवृत्तिवेतन (अंशराशीकरण मुल्य विचारात न घेता) पारिश्रमिक आणि अशाप्रकारे निश्चित होणाऱ्या मासिक पारिश्रमिक ''जास्तीत जास्त २५ टक्के इतक्या मर्यादेपर्यंत '' भत्त्यांपोटी एकत्रित रक्कम प्रतिमाह देय असेल.

२. **-: शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि वयोमर्यादा :-**

१) **शैक्षणिक अर्हता** :- उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदवीधर असावा.

**२) अनुभव:-** उमेदवाराकडे केंद्र/राज्य शासनाच्या विभागातील किमान २० वर्षांचा कामकाजाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

**३)** उमेदवाराची मानसिक व शारीरिक स्थिती चांगली असावी.

**४)** उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे ज्ञान असावे.

**५) वयोमर्यादा** :- **प्रशिक्षक** या पदासाठी उमेदवाराचे वय दिनांक ३१/०८/२०२६ रोजी ६३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

## -: कर्तव्ये व जबाबदाऱ्या :-

**प्रशिक्षक या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या हया खालीलप्रमाणे राहतील.**

बृहन्मुंबई पोलीस दलात कार्यरत आणि गोपनीय माहितीचे संकलन आणि विश्लेषण करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदारांना गुप्तवार्ता संकलनाबाबत आणि विश्लेषणाबाबत प्रशिक्षित करणे.

## अटी व शर्ती :-

१) प्रशिक्षक या पदावरील नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीची असेल. उमेदवाराला शासकीय अधिकारी म्हणून गणले जाणार नाही.

२)उमेदवाराची निवड मुलाखतीद्वारे करण्यात येईल. मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना नंतर कळविण्यात येईल.

३) सदर नेमणुक ही करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यांसाठी करण्यात येईल. ११ महिन्यांनंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी (जास्तीत जास्त २ वेळा, ११ महिन्यांकरिता) वाढविता येईल. २ वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही अशा उमेदवाराची पुन:श्च नियुक्ती करणे आवश्यक आहे असे, सक्षम प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुन:श्च निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागेल.

४) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

५) निवड केलेला उमेदवार ११ महिन्यांच्या कराराच्या कालावधीत कोणत्याही प्रकारचे खाजगी व्यवसाय नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या लेखी परवानगी शिवाय करू शकणार नाही. जर नियुक्ती प्राधिकाऱ्याने सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरू ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

६) मुलाखतीसाठी उपस्थित राहण्यासाठी उमेदवाराला कोणताही प्रवासखर्च देण्यात येणार नाही.

७) नियुक्त केलेल्या उमेदवारास या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा (Agreement) भरणे अनिवार्य राहील.

८) करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना एकत्रित वेतन आणि भत्यांव्यतिरिक्त (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

९) उमेदवारांनी वर विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी दिनांक ३१/०८/२०२६ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. स्वाक्षरी नसलेले तसेच प्रमाणपत्राच्या प्रती साक्षांकित नसलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. अर्जासोबत स्वतःच्या निवासस्थानाचा संपूर्ण पत्ता नमूद केलेले दोन लिफाफे जोडावेत.

१०) अर्जासोबत २.५ से.मी. X २.५ से.मी. आकाराचे सध्याचे काढलेले २ रंगीत फोटो जोडावेत.

११) अपूर्ण माहिती भरलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**( डॉ. प्रविण मुंढे )**
**अपर पोलीस आयुक्त**
विशेष शाखा-१, गु.अ.वि., मुंबई.

## ब) अर्जदाराची शैक्षणिक माहिती

८. शैक्षणिक अर्हता :

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नांव (विद्यालय/महाविद्यालय) | बोर्ड/ विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १.माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ.१० वी) अथवा जुनी ११ वी परिक्षा | | | | | |
| २. उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ.१२ वी) | | | | | |
| ३. पदवी | | | | | |

९. इतर शैक्षणिक अर्हता :

संगणक प्रशिक्षित आहे काय?: होय ☐ / नाही ☐

१०) अर्जदाराची इतर माहिती: **( कामाचा अनुभव ) सोबत कागदपत्रे जोडावी.**

| | | |
|---|---|---|
| ११-अ<br><br><br><br><br><br><br><br>११-ब | अर्जदारावर यापूर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात/स्थानबध्द करण्यात/बध्द करण्यात/दंड करण्यात/ सिध्दोषी ठरण्यात आले आहे काय, किंवा लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या परीक्षांना/निवडींना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय, किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय, किंवा कोणत्याही विद्यापीठाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडून/संस्थेकडून कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय/काढून टाकण्यात आले आहे काय?<br>हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयीन, विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात/संस्थेत उमेदवाराविरूध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय? | : होय ☐<br>नाही ☐<br><br><br>: होय ☐<br>नाही ☐ |

# <u>अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र</u>

मी, श्री./सौ./कु. ------------------------ याद्वारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड/नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पूर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतीत माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण :

दिनांक : अर्जदाराची सही

(दिनांकासह)

**सोबत :** अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती.